**Formation of (State Level Nodal Agency -SLNA) and (District Watershed Development Unit- DWDU) under Common Guidelines for Watershed Development Project,2008)**

**केंद्र शासनाच्या सामाईक मार्गदर्शक सूचना २००८ अन्वये राज्यस्तरीय नोडल यंत्रणा व जिल्हा पाणलोट विकास युनिट गठीत करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

**ग्राम विकास व जलसंधारण विभाग**

शासन निर्णय क्रमांक सामासू-१००८/प्र.क्र.४१/जल २०,

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

**दिनांक :- २१ मे,२००८**

वाचा :

१) शासन निर्णय, ग्राम विकास व जलसंधारण विभाग क्रमांक समिती-२००६/प्र.क्र.१०३/जल २०,दिनांक :-१४ डिसेंबर, २००६.

२) केंद्रीय कृषि मंत्रालयाचे चे कृषि व सहकार विभागाचे आदेश क्र FN०.९-२/२००५RFD-IV दिनांक ३ नोव्हेंबर २००६

३) केंद्रीय ग्रामीण विकास मंत्रालयाचे अपरसचिव(भुसांधन विभाग) यांचे अ.शा.पत्र क्र Z-११०१२/१/२००८- GC दिनांक २५ मार्च २००८ चे पत्रान्वये अग्रेषित केलेल्या केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचना Common Guidelines for Watershed Development Project, २००८

४)केंद्रीय ग्रामीणविकास मंत्रालयाचे सचिव (भुसांधन विभाग) यांचे अ.शा.पत्र क्र Z-११०११/७/०८-PPC दिनांक ९ एप्रिल, २००८

**प्रस्तावना:**

प्रो. हनुमंतराव यांच्या अध्यक्षतेखाली १९९४ मधे नेमलेल्या समितीच्या शिफारशीनुसार अवर्षण प्रवण क्षेत्र कार्यक्रम (DPAP) व १९९४ मध्ये केंद्र पुरस्कृत अवर्षण प्रवण क्षेत्र विकास कार्यक्रम मार्गदर्शक सूचना लागू करण्यात आल्या. या कार्यक्रमाखाली राज्यात ८७२ पाणलोट मंजूर करण्यात आले होते व २००३ मध्ये हा कार्यक्रम बंद करण्यात आला. याच मार्गदर्शक सूचनांनुसारआश्वासित रोजगार हमी योजनेखाली १५८२ पाणलोटात कामे सुरु होती. हे दोन्ही कार्यक्रम सन २००३ मध्ये केंद्र शासनाने बंद केले.

२. दुसऱ्या टप्प्यात सन १९९९ ते २००२ या कालावधीमध्ये केंद्र शासनाने राज्यात १४०३ पाणलोट मंजूर केले. या पाणलोटांकरिताच्या मार्गदर्शक सूचना सन २००१ मध्ये लागू झाल्या. तिसऱ्या टप्प्यामधे एप्रिल, २००३ पासून हरियाली मार्गदर्शक सूचना लागू करण्यात येऊन या कार्यक्रमाखाली सन २००३ ते २००६ या कालावधीत राज्यात १३९५ पाणलोट मंजूर करण्यात आले. या सर्व पाणलोटांची कामे राज्यात सध्या सुरू आहेत. या मार्गदर्शक सूचना त्याकालावधीत मंजूर झालेल्या एकात्मिक पडीक जमीन विकास कार्यक्रम (IWDP) खालील मंजूर झालेल्या प्रकल्पांनाही लागू होत्या. त्यानुसार सध्या ८४ प्रकल्पांची कामे सुरू आहेत.

३. अवर्षण प्रवण क्षेत्र विकास कार्यक्रमातील पाणलोट केंद्र शासनाने अधिसूचित केलेल्या १४८ तालुक्यात मंजूर करण्यात आले आहेत. तर या १४८ तालुक्यांव्यतिरिक्त १९९८ पासून एकात्मिक पडीक जमीन विकास कार्यक्रम राबविण्यात येतो.

४. १९९४ च्या मार्गदर्शक सूचनांनुसार केंद्र व राज्य शासन हा हिस्सा अवर्षण प्रवण क्षेत्र कार्यक्रमाकरिता व आश्वासित रोजगार योजनेकरिता ५०:५० असा होता. दुसऱ्या टप्प्यातील १९९९ च्या तसेच तिसऱ्या टप्प्यातील २००३ च्या मार्गदर्शक सुचनांअन्वये प्राप्त झालेल्या पाणलोटांकरीता केंद्र व राज्य शासन हिस्सा ७५:२५ असा आहे. १९९४ ते १९९९ या कार्यक्रमाकरिता केंद्र शासनाकडून सात हप्त्यांमध्ये तर २००३ च्या कार्यक्रमापासून पाच हप्त्यामध्ये निधी मिळत आहे.

५.	या सर्व कार्यक्रमातील पाणलोट विकास कार्यक्रम हा पंचायत राज संस्थांमार्फत करावयाचा होता. तसेच योग्य त्या प्रकल्प कार्यान्वयीन अभिकरणाची निवड करण्याची बाब जिल्हास्तर काम पाहणा-या या कार्यक्रमाच्या नोडल यंत्रणेकडे म्हणजे जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेकडे सोपविण्यात आली होती. घटनेच्या ७३ व्या घटना दुरुस्तीनुसार २००३ च्या कार्यक्रमामध्ये प्रथम पंचायत राज संस्थांचा त्यांनतर इतर शासकीय यंत्रणा व त्यांनंतर अशासकीय संस्था असा प्राथम्यक्रम आहे. या सर्व कार्यक्रमांमध्ये प्रकल्प मंजुरीचे अधिकार, मुल्यांकन करणा-या संस्था यांचे निवडीचे अधिकार हे केंद्र शासनाकडे आहेत. तसेच प्रकल्प कार्यान्वीयन अभिकरणामध्ये बदल करावयाचे झाल्यास त्यालाही केंद्र शासनाची मंजुरी आवश्यक आहे. जिल्हास्तर यंत्रणा तसेच राज्य शासनाला या कार्यक्रमास समन्वय, सल्ला देणे, शिफारस करणे व संनियंत्रण व तत्सम भूमिकेपुरताच वाव होता.

६.	केंद्रिय मंत्रालयाच्या ग्रामीण विकास मंत्रालयाकडून अवर्षण प्रवण क्षेत्र विकास कार्यक्रम व एकात्मिक पडीक जमीन विकास कार्यक्रम राबविण्यात येतात तर केंद्रीय कृषि मंत्रालयामार्फत राष्ट्रीय पाणलोट विकास प्रकल्प व नदीखोरे प्रकल्प हे पर्जन्य आधारित क्षेत्रामध्ये राबविण्यात येतात. कृषि मंत्रालयाच्या २००० साली सुधारित मार्गदर्शक सुचना जाहीर करताना केंद्रीय ग्रामीण विकास मंत्रालयाच्या कार्यक्रमांचाही समावेश करण्याचा उद्देश होता. तथापि, केंद्रीय ग्रामीण विकास मंत्रालयाने २००१ व २००३ मध्ये मार्गदर्शक सूचना सुधारित केल्याने दोन्ही मंत्रालयाचे कार्यक्रम एकाच मार्गदर्शक सूचनाखाली समाविष्ट करता आले नाहीत.

७.	केंद्र शासनाचे संदर्भाधीन २ येथील दिनांक ३ नोव्हेंबर, २००६ चे आदेशान्वये अविकसित क्षेत्राचे विकासावर विशेष भर देण्याकरीता नॅशनल रेनफेड एरिया ॲथॉरिटीची (National Rainfed Area authority-NRAA) स्थापना केली असून या ॲथॅरीटीच्या Governing Body चे अध्यक्ष हे मा केंद्रीय कृषि मंत्री आहेत. नियोजन आयोगाच्या मान्यतेने पाणलोट विकासाकरीता एकच सामाईक मार्गदर्शक सुचना २००८ (Common Guidelines for Watershed Development Project, 2008) या नॅशनल रेनफेड एरिया ॲथॉरिटी (NRAA) मार्फत सर्व केंद्रीय मंत्रालयासाठी दिनांक १ एप्रिल, २००८ पासून नव्याने मंजूर होणा-या पाणलोट प्रकल्पांकरीता लागू झाल्या आहेत.. या मार्गदर्शक सुचनांनुसार राज्यस्तरावर नोडल यंत्रणा व जिल्हास्तरावर युनिटस स्थापन करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**<u>शासन निर्णय</u>** :

केंद्र शासनाने स्थापन केलेल्या नॅशनल रेनफेड एरिया ॲथॉरिटी (NRAA) मार्फत पाणलोट विकास प्रकल्पाकरीता सामाईक मार्गदर्शक सुचना २००८ (Common Guidelines for Watershed Development Project, 2008) निर्गमित केल्या आहेत. यानुसार संर्व संबंधित केंद्रीय मंत्रालयांमार्फत दिनांक १ एप्रिल, २००८ पासून मंजूर होणा-या पाणलोट प्रकल्पांकरीता या सामाईक मार्गदर्शक सुचना २००८ (Common Guidelines for Watershed Development Project, 2008) लागू केल्या आहेत.

२	उपरोक्त सामाईक मार्गदर्शक सुचना २००८ नुसार केंद्रीय ग्रामीण विकास मंत्रालयाचे भुसंसाधन विभागाने या मार्गदर्शक सुचनांस अनुसरून DPAP/IWDP/DDP करीता, एकत्रित **<u>Integrated Watershed Management Programme (IWMP)</u>** हा कार्यक्रम जाहीर केला आहे .

३	केंद्र शासनाच्या या मार्गदर्शक सुचनुंसार केंद्र स्तरावर खालीलप्रमाणे व्यवस्था निर्माण करण्यात आली आहे.

1) National Rainfed Authority ही संस्था शिखर संस्था (Apex Body)
2) केंद्रीय मंत्रालय हे संबंधित पाणलोट कार्यक्रमांकरीता नोडल मंत्रालय म्हणून काम पाहतील.
3) नोडल मंत्रालयाने पाणलोट विकास कार्यक्रमाकरीता यंत्रणा स्थापन करणे अथवा नोडल एजन्सी नेमणे.
4) National Level Data Centre

४ तर केंद्र शासनाच्या या मार्गदर्शक सुचनांुसार राज्यस्तरावर खालीलप्रमाणे व्यवस्था निर्माण करावयाची आहे

i. राज्य स्तरावरील नोडल यंत्रणा State Level Nodal Agency **( SLNA)**
ii. जिल्हा स्तरावरील पाणलोट विकास युनिट District Watershed Development Unit **(DWDU)**
iii. राज्यस्तरीय माहिती केंद्र State level Data Centre
iv. जिल्हास्तरीय माहिती केंद्र District Level Data Centre

५ केंद्र शासनाचे उपरोक्त मार्गदर्शक सुचनांनुसार १ एप्रिल २००८ पासून नव्याने मंजूर होणा-या पाणलोट विकास प्रकल्पांचे काम पाहण्यासाठी सचिव (जलसंधारण)यांचे अध्यक्षतेखाली ***राज्यस्तरीय नोडल यंत्रणा*** State Level Nodal Agency व जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखालील जिल्हास्तरीय पाणलोट विकास यंत्रणा District Watershed Development Unit स्थापन करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

५.१ ***सचिव (जलसंधारण) यांचे अध्यक्षतेखालील राज्यस्तरीय नोडल यंत्रणेची (SLNA) रचना खालीलप्रमाणे आहे.***

| | |
|---|---|
| सचिव (जलसंधारण) | अध्यक्ष |
| अपर मुख्य सचिव (वने ) अथवा त्यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| अपर मुख्य सचिव (नियोजन) अथवा त्यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| प्रधान सचिव (कृषि) अथवा त्यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| प्रधान सचिव (पाणी पुरवठा व स्वच्छता) अथवा त्यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| सचिव (पदुम) अथवा त्यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| सचिव (ग्रामविकास) अथवा त्यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| प्रधान मुख्य वनसंरक्षक वने | सदस्य |
| उपसचिव (जलसंधारण) | सदस्य |
| राज्य प्रमुख , एनआयसी, मुंबई | सदस्य |
| कृषि आयुक्त | सदस्य |
| संचालक, सामाजिक वनीकरण | सदस्य |
| संचालक महाराष्ट्र सुदूर संवेदन केद्र (MRSAC) | सदस्य |
| संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा | सदस्य |
| मुख्य अभियंता व सह सचिव (रोहयो, नियोजन) | सदस्य |
| मुख्य अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) | सदस्य |
| आयुक्त, पशुसंवर्धन | सदस्य |
| आयुक्त, दुग्धव्यवसाय | सदस्य |
| आयुक्त, मत्स्यव्यवसाय | सदस्य |
| केंद्र शासन /NRAA/DoLR/NABARD या संस्थांनी नामनिर्देशित केलेले सदस्य | सदस्य |
| स्वयंसेवी संस्था (नामनिर्देशनाने) | सदस्य |
| संचालक, मृदसंधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन, कृषि आयुक्तालय, पुणे | सदस्य व मुख्य कार्यकारी अधिकारी, |

**<u>यंत्रणेची कार्यकक्षा खालीलप्रमाणे राहील :-</u>**

अ) तालुका स्तरावर व जिल्हास्तरावर तयार करण्यात आलेले पाणलोटांचे यथार्थदर्शी आराखडे, ज्यामध्ये पाणलोट विकासाचे धोरण, वित्तिय नियतव्यय, अपेक्षित साध्य/फलनिष्पत्ती यांचा समावेश असून त्याआधारे राज्याचा आराखडा तयार करणे व केंद्रीय नोडल एजन्सीकडून मंजूर करून घेणे

ब) राज्याला मंजूर होणा-या निधीमधून स्टेट लेवल डाटा संस्था स्थापन करणे व केंद्रीय संस्थेशी Online जोडणी घेणे

क) जिल्हा पाणलोट विकास युनिटला (DWDU) तांत्रिक सहाय्य पुरविणे

ड) NRAA/MoRD यांचेशी संपर्क साधून क्षमता बांधणीकरीता राज्यातील संस्थांचे यादीस मंजुरी मिळविणे.

इ) पारदर्शक पध्दत वापरून जिल्हा पाणलोट विकास संस्थेने मंजूर केलेल्या प्रकल्प कार्यान्वयीन अभिकरणांचे यादीला मान्यता देणे.

फ) विविध स्तरावर अंतर्गत/बाहय/त्रयस्थ संस्थांमार्फत सनियंत्रण मुल्याकंन करण्याकरीता यंत्रणा स्थापन करणे.

ग) NRAA/MoRD यांचेशी संपर्क साधून राज्याकरीता विविक्षित समस्यांकरीता मार्गदर्शक सुचना तसेच तांत्रिक मार्गदर्शक संहिता तयार करणे.

५.२ ***<u>जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखालील जिल्हा पाणलोट विकास युनिटची (DWDU) रचना खालीलप्रमाणे राहील</u>***

| | |
|---|---|
| जिल्हाधिकारी - | अध्यक्ष |
| मुख्य कार्यकारी अधिकारी- | सहअध्यक्ष |
| उपजिल्हाधिकारी (रोहयो) - | सदस्य |
| प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण .विकास यंत्रणा - | सदस्य |
| उपसंचालक, सामाजिक वनीकरण - | सदस्य |
| उपवनसंरक्षक - | सदस्य |
| कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्था.स्तर)- | सदस्य |
| वरिष्ठ भूवैज्ञानिक - | सदस्य |
| जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी - | सदस्य |
| जिल्हा दुग्ध व्यवसाय अधिकारी- | सदस्य |
| जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी - | प्रकल्प व्यवस्थापक तथा सदस्य सचिव |

**<u>(DWDU) जिल्हास्तरीय पाणलोट विकास युनिटची कार्यकक्षा</u>**

i. पाणलोट विकास प्रकल्पांचा एकत्रित आराखडा जिल्हा पाणलोट विकास नियोजन आराखडयाकरीता बनविणे. ज्यामध्ये आर्थिक नियोजनाचा समाविष्ट असेल.

ii. पाणलोट विकासाकरीता (SLNA) ने विहित केलेल्या पध्दतीनुसार प्रकल्प कार्यान्वयीन अभिकरणाची नियुक्ती एम्पॅनेलमेंटमधून करणे.

iii. पाणलोट विकासाचे वार्षिक आराखडे बनविण्याकरीता व धोरण ठरविण्याकरीता सर्वोतोपरी सहाय्य करणे व सुविधा उपलब्ध करून देणे

iv. क्षमता बांधणीकरीता कृती आराखडा रिसोर्स ऑर्गनायझेशनचे सहभागान्वये तयार करणे व अंमलात आणणे

v. जिल्ह्यात सुरू असलेल्या पाणलोट विकासाच्या सर्व राज्य व केंद्र पुरस्कृत योजनांचा एकत्रित आढावा घेणे, संनियंत्रण करणे व स्थानिक परिस्थितीनुसार मार्गदर्शक सूचनांच्या अधिन राहून योग्य दिशानिर्देश देणे.
vi. पाणलोट विकास प्रकल्पास नियमितपणे निधी उपलब्ध होईल याची दक्षता घेणे.
vii. विहित केलेली कागदपत्रे वेळोवेळी SLNA/CLNA ला मिळतील याची दक्षता घेणे.
viii. कृषि, पशुसंवर्धन, ग्रामविकास, फलोत्पादन इ. कार्यक्रमांचा समन्वय पाणलोट विकास प्रकल्पाकरीता राखणे जेणेकरून उत्पादतकता व राहणीमान उंचावेल .
ix. गावापासून जिल्ह्यापर्यंत पाणलोट विषयक Data Base तयार करून घेणे तो SLNA व सेंट्रल डाटा एजन्सीला जोडणे
x. पाणलोट विकास प्रकल्पाचे नियोजन व अंमलबजावणीकरीता प्रकल्प कार्यान्वीन अभिकरणास तांत्रिक सहाय्य उपलब्ध करून देणे

६. तसेच सामाईक मार्गदर्शक सुचना २००८च्या परिच्छेद १० नुसार दिनांक १ एप्रिल २००८ पुर्वी केंद्र शासनाने मंजूर केलेल्या DPAP/HARIYALI/IWDP पाणलोट/ प्रकल्प संबंधित मागदर्शक सुचनांनुसारच कार्यरत राहतील.

७. हा शासन निर्णय केंद्र शासनाचे सामाईक मार्गदर्शक सुचनास अनुलक्षून निर्गमित करण्यात येत आहे.

८. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २००८०५२११६५५१५००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावांने,

(रेखा भिडे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,
मा. राज्यपाल यांचे खाजगी सचिव,
मा.मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
मा. मंत्री, जलसंधारण, यांचे खाजगी सचिव
सर्व मंत्री, राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
मा.उपाध्यक्ष,महाराष्ट्र राज्यस्तरीय जलसंधारण सल्लागार परिषद.
मा. राज्यमंत्री, जलसंधारण, यांचे खाजगी सचिव
मा. मुख्य सचिव, यांचे सहसचिव
शासनाचे सर्व अप्पर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव,
अपर मुख्य सचिव (वने )
अपर मुख्य सचिव (नियोजन)
प्रधान सचिव (कृषि)
प्रधान सचिव (पाणी पुरवठा व स्वच्छता)
सचिव (पदुम)
सचिव (जलसंधारण)
सचिव (ग्रामविकास)
प्रधान मुख्य वन सरंक्षक, नागपूर, महाराष्ट्र राज्य, नागपूर,

सर्व विभागीय आयुक्त,
आयुक्त (कृषि), महाराष्ट्र राज्य, पुणे,
महासंचालक, माहिती व जनसंपर्क, मुंबई (प्रसिध्दी करीता),
महासंचालक, कै.वसंतराव नाईक स्वावलंबन मिशन
महासंचालक, यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी, यशदा पुणे.
राज्य प्रमुख, एन्.आय्.सी. मुंबई
संचालक, सामाजिक वनीकरण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे,
संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे,
संचालक, मृदसंधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन, महाराष्ट्र राज्य, पुणे
संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई,
संचालक, महाराष्ट्र सूदूर संवेदन केंद्र, नागपूर
उपसंचालक, सामाजिक वनीकरण
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व उपजिल्हाधिकारी (रोहयो)
सर्व उपायुक्त (विकास)
सर्व मुख्य अभियंता, पाटबंधारे
मुख्य अभियंता, लघु पाटबंधारे (स्थानिक स्तर),पुणे
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,
सर्व प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा,
सर्व अधीक्षक अभियंता, पाटबंधारे,
सर्व अधीक्षक अभियंता, लघु पाटबंधारे, (स्थानिक स्तर)
वरिष्ठ भूवैज्ञानिक
जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी
जिल्हा दुग्ध व्यवसाय अधिकारी
विभागीय कृषि सहसंचालक, ठाणे, पुणे, कोल्हापूर, नाशिक, औरंगाबाद, अमरावती, नागपूर, लातूर.
सर्व अधिक्षक कृषि अधिकारी,
सर्व सहसंचालक, सामाजिक वनीकरण वृत्ते, नागपूर/अकोला /औरंगाबाद/ नाशिक/कोल्हापूर/कोकणवृत्त-ठाणे.
सर्व मुख्य वनसंरक्षक, / सर्व उपवनसंरक्षक
सर्व विभागीय वनसंरक्षक/ सर्व विभागीय मृदसंधारण अधिकारी,
सर्व उपसंचालक, सामाजिक वनीकरण विभाग,
सर्व सदस्य, महाराष्ट्र राज्य जलसंधारण सल्लागार परिषद.
प्रमुख मार्गदर्शक, महाराष्ट्र राज्य जलसंधारण सल्लागार परिषद
महालेखापाल, (लेखापरिक्षा), महाराष्ट्र १ व २ , मुंबई व नागपूर,
महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता),महाराष्ट्र १ व २ , मुंबई व नागपूर,
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
सर्व मंत्रालयीन विभाग,
सर्व कार्यासने/अधिकारी, ग्राम विकास व जलसंधारण विभाग,मंत्रालय, मुंबई.
निवडनस्ती - जल-२०